# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २३.०२.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २२/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९९ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५४,४९०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २२/०२/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन २७.०४ लिटर दारू असा एकुण ६,३६०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**गुटखा बंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. २२/०२/२०२३ रोजी पोस्टे आखाडा बाळापुर येथे कलम ३२८,२७२,२७३,१८८ भादवी सह कलम २६(२)(प),२६(२)(पअ),२७(२)(म),३०(२)(अ),५९ अन्नसुरक्षा व मानके अधि अन्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले असुन यातील नमुद आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला गुटखा व मानवी जिवीतास धोका असलेले पान मसाले विक्री करण्याच्या उददेशाने स्वताचे ताब्यात बाळगतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास हिंगोली शहर पोलीस करित आहेत.

**सरकारी कामात अडथळा निर्माण करनाणाऱ्या विरूध्द दाखल गुन्हे :—**

दि. २२/०२/२०२३ रोजी पोस्टे कळमनुरी येथे कलम ३५३, ३३२, २२४ भादंवी सहकलम ४/२५ भारतीय हत्यार कायदयान्वये दाखल असुन यातील आरोपी यास गुरन ३२४/२१ कलम ३०७ भादवी सहकलम ४/२५ भा.ह.का मोका गुन्हयात फरारी असल्याने त्यास पोनि मुंढे व फिर्यादी,स्टॉप सह सदर आरोपीस अटक करणे असल्याने सदर आरोपीस पकडत असतांना झटापटी केली त्यामध्ये कॉर्बाईन गन मधुन झटक्याने एक राउंड फायर होवुन बाजुला उभे असलेले पोलीस उपनिरीक्षक माजीद यांचे डाव्या बाजुला छातीत बुलेट लागुन जखमी केले व सरकारी कामकाजात दहशत निर्माण करण्याचे व आपली अटक चुकवण्याच्या उदेशाने पोलीसा सोबत झटापट करून सरकारी कामात अडथळा निर्माण केला व आरोपीच्या घरझडतीमध्ये पलंगाच्या खाली कापडयात गुंडाळलेली तलवार मिळुन आली म्हणुन गुन्हा.